**प्रकल्प प्रवर्तक- मेसर्स ट्वेंटीवन शुगर्स लिमिटेड, (युनिट-II), सर्व्हे नं.४०७, देविनगर तांडा, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी, महाराष्ट्र, यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता - ३,५०० टीसीडी वरुन १०,००० टीसीडी (६,५०० टीसीडीने वाढ), सहवीज निर्मिती प्रकल्प २० मे.वॅट वरुन ५० मे.वॅट (३० मे. वॅटने वाढ), तसेच प्रस्तावित २०० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेचा मल्टीफिड आधारित आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स ट्वेंटीवन शुगर्स लिमिटेड, (युनिट-II), सर्व्हे नं.४०७, देविनगर तांडा, तालुका - सोनपेठ, जिल्हा - परभणी, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता ३,५०० टीसीडी वरुन १०,००० टीसीडी (६,५००.० टीसीडीने वाढ), सहवीज निर्मिती प्रकल्प २० मे. वॅट वरुन ५० मे.वॅट (३० मे. वॅटने वाढ), तसेच प्रस्तावित २०० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेचा मल्टीफिड आधारित आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक १५ फेब्रुवारी , २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

श्री श्रीपाद रामकृष्णराव कुलकर्णी, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री महेश वडदकर, अपर जिल्हादंडाधिकारी, परभणी तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री दिलीप को. खेडकर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

**आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीमुळे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशांनुसार ही प्रत्यक्ष जनसुनावणी (Physical Public Hearing) आयोजित

करण्यात आलेली असून उपस्थितांना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशांचे पालन करण्याची सूचना करण्यात येते. त्यानुसार, दोन व्यक्तींमध्ये अंतर ठेवणे, सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या जागी करण्यात आलेला असून बैठकीत प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवण्याची सूचना केली.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स ट्वेंटीवन शुगर्स लिमिटेड (युनिट-II), सर्व्हे नं.४०७, देविनगर तांडा, तालुका सोनपेठ, जिल्हा परभणी, महाराष्ट्र यांचा त्यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण ऊस गाळप क्षमता ३,५०० टीसीडी वरुन १०,००० टीसीडी (६,५०० टीसीडीने वाढ), सहवीज निर्मिती प्रकल्प २० मे. वॅट वरुन ५० मे.वॅट (३० मे. वॅटने वाढ), तसेच प्रस्तावित २०० किलो लिटर प्रतिदिन क्षमतेचा मल्टीफिड आधारित आसवणी प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ए आसवणी - ५ (जी), साखर उद्योग - ५ (जे), वीज निर्मिती- १(डी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

**आयोजक** यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने मंजूरी दिनांक २२-११-२०२२ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, परभणी यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-०६/२०२३ व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३०११९-एफटीएस०१३६ दिनांक १९-०१-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, परभणी किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, परभणी यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक “सकाळ” यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र दैनिक “टाइम्स ऑफ इंडिया” यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना

दिनांक ०८-०१-२०२३ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचे सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, परभणी,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय- सोनपेठ, तालुका- सोनपेठ, जिल्हा- परभणी

६) ग्रामपंचायत कार्यालय - देविनगर, तालुका-सोनपेठ, जिल्हा- परभणी

७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

८) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, शिव (पूर्व), मुंबई-४०० ०२२

९) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय-औरंगाबाद, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, दैनिक लोकपत्रच्या मागे, सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल शेजारी, जालना रोड, औरंगाबाद

१०) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, देवकृपा इमारत, पहिला मजला, रंगनाथ महाराज नगर, नांदखेडा रोड, परभणी - ४३१ ४०१

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई,

**आयोजक** यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास तशी संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

**आयोजक** यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन सदर इतिवृत्त पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाचा एकूण खर्च ४३७.० कोटी रुपये असून, पर्यावरण व्यवस्थापनासाठी खर्च ४० कोटी रुपये होईल. त्याचप्रमाणे सीईआर साठी ४.५ कोटी राखून ठेवण्यात आलेले आहेत. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की ईआयए अधिसूचनेनुसर प्रकल्पाची जाहिर जनसुनावणीची सूचना वृत्तपत्रात प्रकाशित केल्यानंतर उप प्रादेशिक कार्यालय, परभणी यांस काही सूचना, आक्षेप प्राप्त झाले. ते खालीलप्रमाणेः-

| **अनु** | **सूचना प्राप्त झाल्याची** | **सूचना पाठविणा-याचे नांव व पत्ता** |
|---|---|---|
| १) | ०९-२-२०२३ | श्री रंगाराव कोथाकोंडा, जिल्हा-रंगारेड्डी, तेलंगणा |

| | | |
|---|---|---|
| २) | १२-०२-२०२३ | श्री के. रामकृष्णा, मातृशक्ती फाऊंडेशन |
| ३) | १४-०२-२०२३ | एच.मधुबाबू, हैद्राबाद |
| ४) | १४-०२-२०२३ | श्री मारोती चव्हाण व केशव राठोड, देविनगर, तालुका-सोनपेठ, जिल्हा- परभणी |

सदरहू प्राप्त झालेल्या सूचना या पर्यावरण जनसुनावणी समितीच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेल्या आहेत.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री शिवाजी तांदळे, राहणार-तांदुळवाडी, तालुका-गंगाखेड, जिल्हा- परभणीः-**

विस्तारिकरणामुळे कारखान्याची क्षमता वाढलेली आहे, तर ऊस विकासासाठी आपले धोरण काय असेल?

**प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक** यांनी उत्तर दिले की -कारखान्याची क्षमता वाढलेली आहे. परिसरातील ऊसाचे योग्य वेळेत गाळप व्हावे, जी शेती आहे, सिंचनाची जी सुविधा आहे, त्याचा परिसरातील शेतक-यांना वापर करता यावा, त्यासाठी ऊस लागवड योजना जाहिर केलेल्या आहेत. त्यात ऊसाचे रोपवाटप असेल, शेतक-यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन असेल, ऊस विकास मेळावे असतील, कारखान्यातील रोपवाटिका असतील, तर शेतक-यांना ऊसपीक टनी वाढविण्याचे मार्गदर्शन असेल, त्यासाठी कारखान्याने ऊसविकास विभाग नुकताच सुरु केलेला असून, त्याचे कामकाज चालू आहे.

२) **श्री सिध्देश्वर ज्ञानोबा यादव, राहणार- खडका गाव, तालुका - सोनपेठ, जिल्हा -परभणीः-**

कारखाना उत्पादनात जी राख उडते, ती परिसरातील लोकांच्या डोळ्यात जाते. पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांवर पसरते. त्यावर काय उपाययोजना करण्यात येईल?

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पात नवीन इन्सिनरेशन बॉयलर कार्यान्वित करण्यात येणार असून कार्यरत बॉयलरची क्षमता वाढविणार आहोत. सदरहू बॉयलरच्या चिमणीस अत्याधुनिक अशी ई.एस.पी. (ईलेक्ट्रो - स्टॅटिक-प्रेसिपरेटर) ही सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार असून ती ९९.९% कार्यक्षमता दाखविते. त्यामुळे प्रदूषकांचा पुर्णपणे अटकाव होईल व हवा प्रदूषण होणार नाही व राखेचा त्रास परिसरातील नागरिकांना होणार नाही. प्रकल्प प्रवर्तक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेले सर्व मानके पाळण्यास बांधिल आहे.

३) **श्री औदुंबर यशवंतराव यादव, राहणार-खडका, तालुका-सोनपेठ, जिल्हा-परभणीः-**
लोकांमध्ये कमी होणा-या वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी कारखाना काय उपाययोजना करु शकेल का?

**प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक** यांनी उत्तर दिले की सादरीकरणात सीएसआर निधीबाबत माहिती देण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी, गावातील लोकप्रतिनिधी यांच्याशी विचारविनिमय करुन गावातील शैक्षणिक सुविधा, वाचनालय, क्रिडांगण अशा विविध सामाजिक योजना सीएसआर मार्फत राबविण्यात येतील. माननीय जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही त्यांची अंमलबजावणी करणार आहोत.

४) **श्री रणजित वसंतराव देशमुख, राहणार-सोनपेठ, तालुका-सोनपेठ, जिल्हा-परभणीः-**
आपल्या कारखान्यामार्फत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती किती होईल?

**प्रकल्प प्रवर्तक** यांनी सांगितले की, प्रकल्पाच्या विस्तारिकरणामुळे परिसरातील कमीतकमी १,००० (एक हजार) बेकार लोकांना रोजगार मिळेल. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पामुळे स्थानिक व्यवसायात प्रचंड वाढ होईल व स्कूटर मेकॅनिक, पानपट्टी, वीजतंत्री कामे(electric work), प्लबंर अशा विविध व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल व यामुळे अप्रत्यक्ष सुमारे ५,००० लोकांना त्याचा लाभ होईल.

यावेळी, **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी आता किती लोकांना रोजगार उपलब्ध केले व त्यात वाढ किती होईल याची संपूर्ण माहिती देण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की कारखान्यांमार्फत

६००-७०० लोकांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करुन देतो. विस्तारिकरणानंतर प्रत्यक्ष रोजगार हा १,००० (एक हजार) लोकांना मिळेल व अप्रत्यक्ष रोजगाराचा फायदा हा ५,००० लोकांना होईल.

५) <u>श्री सतीश त्रंबकराव भोसले, राहणार-सोनपेठ, तालुका - सोनपेठ, जिल्हा-परभणीः-</u>
विस्तारिकरणामुळे परिसरातील ऊसाच्या गाळपात वाढ होईल. माझेही ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणात येते. तरी वेळेवर ऊस गाळप करण्यास आणल्यानंतर आमचा काय फायदा होईल?

**प्रकल्प प्रवर्तक** यांनी सांगितले की गेल्या वर्षी परिसरातील ऊस संपविण्यासाठी जिल्हाधिकारी यांना बैठका घ्याव्या लागल्या व मे, जूनपर्यंत परिसरातील कारखाने चालू ठेवावे लागले. विस्तारिकरणामुळे उत्पादनाचे दिवस कमी होतील व ऊसगाळप वेळेत सुरु झाल्याने शेतक-यांनीही त्याचा फायदा होईल.

६) <u>श्री परमेश्वर पवार, राहणार-खळी, तालुका-गंगाखेड, जिल्हा-परभणीः-</u>
१०,००० टीसीडीपर्यंत ऊसगाळप क्षमता वाढल्याने परिसरात आर्थिक सुबत्ता निश्चितच वाढेल. मात्र कारखाना परिसरात शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचे काय धोरण आहे?

**प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक** यांनी सांगितले की कारखान्यांतील कर्मचारी, कामगार यांच्यासाठी निवास योजना राबविणार आहोत. १० कि.मी. परिसरातील विद्यार्थ्यांना लाभ घेता येईल असे भव्य शैक्षणिक संकूल उभारण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी व प्रकल्प प्रवर्तक यांची एक समिती गठित करुन परिसरातील शैक्षणिक शाळांना संगणक व इतर शैक्षणिक सुविधा पुरविण्यात येतील.

**येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी मत मांडले की स्थानिकांचा शैक्षणिक सुविधांबाबत मागणीबाबत जोर दिसत असून प्रकल्प प्रवर्तकांनी तीन वर्षांचा शैक्षणिक सुविधांबाबतचा व त्यासाठी लागणारा निधी सीएसआर निधीतून खर्च करण्याचा आराखडा तयार करुन सादर करण्यात यावा.

७) <u>श्री सचिन वाघ, राहणार-पोखर्णी, तालुका गंगाखेड, जिल्हा-परभणीः-</u>

कारखान्यात उत्पादन प्रक्रियेत जो टाकाऊ पदार्थ तयार होईल, त्याचा शेतक-यांना काय फायदा होईल? कारखान्याने शेतक-यांचा टाकाऊ पदार्थापासून फायदा करण्याचे काही धोरण आखले आहे का?

यावेळी **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी पूर्वी कसे धोरण होते व आता कसे आहे याचे सविस्तर विवेचन करण्याची सूचना केली.

**प्रकल्प प्रवर्तकांनी** सांगितले की कारखान्यात साखर विभाग व सहवीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित आहे. साखर विभागातून उत्पादन प्रक्रियेत जे दूषित सांडपाणी निघते, त्यावर प्रक्रिया करुनच प्रकल्पातील हरितपट्टा संवर्धनासाठी वापरले जाते. जो प्रेसमड तयार होतो, तो शेतक-यांना खतासाठी उपलब्ध करण्यात येतो. तर ईटीपी स्लज हा काही प्रमाणात खत म्हणून कारखान्यातच वापरला जातो.

विस्तारिकरण प्रकल्पात २०० किलोलिटर प्रति दिन उत्पादनाची आसवणी प्रकल्पाची स्थापना करण्यात येईल. आसवणी प्रकल्पात अत्याधुनिक सयंत्रणा उभारण्यात येणार असून त्यात इन्सिनरेशन बॉयलर असेल. त्याची राख ही पोटॅश रिकव्हरी खत उत्पादकांना विकत देण्यात येईल. प्रकल्प विस्तारीकरणामुळे प्रेसमडच्या प्रमाणात (Quantity) वाढ होईल. विस्तारिकरण प्रकल्पात सीपीयु (Condensate Polishing Unit) मध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रकल्पाची ताज्या पाण्याची गरज कमी होईल. विस्तारिकरणामुळे सांडपाण्याच्या प्रमाणात (Quantity) वाढ होईल. त्यासाठी प्रकल्पातील ईटीपी हा विकसित करण्यात येऊन त्याची क्षमता ही वाढविण्यात येईल. ते प्रक्रिया केलेले पाणी कारखान्यातच १५ हेक्टरच्या भूखंडावर हरितपट्टा विकसित करण्यासाठी वापरण्यात येईल. त्यामुळे कारखान्यातून कुठलाही टाकाऊ पदार्थ हा प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. त्यामुळे परिसरातील लोकांना प्रकल्पामूळे कोणतीही हानी होणार नाही.

८) **<u>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती:-</u>**

कारखाना चालू असताना प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेस काही अडचण आल्यास त्यासाठी कोणती पर्यायी व्यवस्था प्रकल्पात कार्यरत आहे का? तसेच अपघात झाल्यास आपत्कालिन व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) कार्यरत आहे काय?

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की अपघात झाल्यास त्वरित ऊसगाळप बंद करण्यात येईल. तसेच जर ईटीपीमध्ये काही अडचण/त्रुटी असल्यास ती दुरुस्त करुनच नंतर परत ऊसगाळप सुरु करण्यात येईल.

९) <u>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की त्यांचे काही मूलभूत प्रश्न (Basic Questions) आहेत.

अ) आपण जे सर्वेक्षण केले, त्याचा कालावधी कोणता होता?
**पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की मागच्या वर्षी मार्च, एप्रिल व मे महिन्यात सर्वेक्षण करण्यात आले.

ब) कारखाना सुरु असताना सर्वेक्षण केले वा बंद असताना सर्वेक्षण केले?

**पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की कारखाना सुरु असताना सर्वेक्षण केले.

त्यावेळी, सदस्य यांनी आक्षेप नोंदविला की बैठकीत एका व्यक्तीने प्रकल्पातून चिमणीवाटे राख परिसरात, पिण्याच्या पाण्यात पडते असा आक्षेप नोंदविलेला आहे. मात्र तुमच्या विश्लेषणात देखरेख परिणाम (monitoring results) हे पूर्णपणे नॉर्मल दाखविण्यात आलेले आहेत. तर ते नॉर्मल कसे? तुम्ही उत्तर दिले विस्तारिकरण प्रकल्पात ईएसपी लावण्यात येईल म्हणजे आता कार्यरत नाही.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की प्रकल्पात हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित आहेत.

**सदस्य यांनी** मत मांडले की आपल्या अहवालात त्याबाबत माहिती येणे अपेक्षित होते. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की एनएबील मान्यता प्राप्त प्रयोगशाळेत पाणी, हवेचे नमुने तपासून घेतलेले आहेत. त्यांनी दिलेले रिझल्ट्स आम्ही उपलब्ध केलेले आहेत. **सदस्य यांनी मत** मांडले की पर्यावरणविषयक सल्लागार म्हणून त्यांनी आपल्याला नेमले आहे. तर प्रकल्प व्यवस्थापनाने बैठकीत त्यांची जबाबदारी आहे हे घोषित करणे गरजेचे आहे. येथील सामान्य जनतेस हा अहवाल का तयार करतात हे माहित नसते. ह्या

अहवालाद्वारे प्रकल्प सुरु होण्यापूर्वीची परिस्थिती काय आहे हे समजते. हा बेसलाईन डेटा म्हणून ग्रहित धरण्यात येतो. प्रकल्प सुरु होण्याअगोदर संभाव्य प्रदूषणाचे धोके व प्रकल्प सुरु झाल्यानंतर पर्यावरणावर झालेले परिणाम यांचा अभ्यास केला जातो. तरी ती जबाबदारी प्रकल्प प्रवर्तक टाळू शकत नाही, असे त्यांनी घोषित करणे अपेक्षित आहे.

**प्रकल्प प्रवर्तकांनी** ह्याला प्रतिसाद देत सांगितले की पर्यावरणावरील प्रत्येक परिणामाची सर्व जबाबदारी प्रकल्प व्यवस्थापनाची राहील.

क) **सदस्य** ह्यांनी विचारले की, प्रकल्पात किती जमिन उपलब्ध आहे? त्यात कार्यरत प्रकल्प किती एकरात -म्हणेज रस्ता, मशिनरी वगैरे आहे? प्रकल्प प्रवर्तक किती जागेवर हरितपट्टा विकसित करणार?

**प्रकल्प प्रवर्तकांनी** उत्तर दिले की ४,४०,००० स्केअरमीटर म्हणजे ११४ एकर जमीन आहे. 30-35 एकर वर **प्रकल्प** आहे. ८०-८५ एकर जागा शिल्लक आहे. ४० एकरावर हरितपट्टा विकसित करण्यात येईल. तर सांडपाणी निर्मिती ही ६८६.० घनमीटर सांडपाणी निर्मिती होईल. तर एवढे सांडपाणी सोडण्यासाठी किती जागा लागेल?

**सदस्य** यांनी मत मांडले की एका एकरवर २०.० घनमीटर पाणी देऊ शकतो. तर ६८६ घनमीटर सांडपाण्यासाठी किती जागा लागेल?

**प्रकल्प प्रवर्तक** यांनी सांगितले की ईटीपी शेजारीच प्रकल्पाची २०-४० गुंठे नियोजित जागा आहे. जागा ७००.० घनमीटरसाठी आवश्यक असताना १,०००.० घनमीटर प्रति दिन एवढा क्षमतेचा ईटीपी विकसित करणार आहोत.

**सदस्य यांनी** विचारले की आपण लॅण्ड डिस्पोझल करणार की नाही? कारण after treatment only, land disposal करायचे आहे. तर विस्तारिकरणाचा विचार करता land disposal साठी तेवढी जमीन दिसत नाही.

**प्रकल्पाचे कार्यकारी संचालक** यांनी उत्तर दिले की आजूबाजूचे जे शेतकरी आहेत, त्यांच्याबरोबर करार करण्यात आलेला आहे. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यावर कारखान्याने ऊसाची लागवड केलेली आहे. आता त्या पाण्यावर २०-२२ एकर ऊस लागवड झालेली आहे. तो अतिशय चांगल्या पध्दतीने वाढवला गेलेला आहे.

**सदस्य यांनी येथे** सूचना केली की जी काही जागा उपलब्ध आहे, त्याचा विचार करता, शेतक-यांबरोबर करार करुनच land disposal करावे लागेल.

**सदस्य यांनी** हरितपट्टा विकासाच्या स्थानाबाबत विचारणा करताना 33% हरितपट्टा पर्यावरण अनुमतीनुसार कुठे असावा, ग्रीन बेल्टचा उद्देश काय हे याबाबत माहिती विचारली.

**पर्यावरण सल्लागार** यांनी माहिती दिली की हरितपट्टा विकासाचा मुळ उद्देश कारखान्यातील प्रदूषके ही बाहेर जाऊ नयेत, प्रदूषकांचा अटकाव व्हावा हा असतो.

**सदस्य यांनी मत** मांडले की, प्रदूषकांचा अटकाव व्हावा हा मूळ उद्देश आहे. त्यासाठी 33% हरितपट्टा म्हणजे पर्यावरण अनुमतीनुसार एकूण भूखंडाच्या क्षेत्राचा विचार करुन 33% हरितपट्टा विकसित करणे व तो प्रकल्पाच्या चारी बाजूंनी विकसित करणे बंधनकारक आहे. मात्र तसे होताना दिसत नाही. बाजूला तेवढा जागा सोडलीच जात नाही.

**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी पुढे सूचना केली की प्रकल्पाच्या चारी बाजूंनी हरितपट्टा विकसित करण्यात यावा व त्यानुसारच हरितपट्टा विकसनाची आखणी करण्यात यावी.

यावेळी **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** हरितपट्टा विकसनामध्ये कुठल्या जातीची झाडे लावण्यात येतील व त्याबद्दलच्या नियोजनाबाबत माहिती विचारली.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की स्थानिक आजूबाजूला जी झाडे असतात, ती लावणे अपेक्षित आहे. जास्त पाने असलेली, जास्त हिरवीगार, बाराही महिने हिरवागार राहणारी उदा. - पिंपळ म्हणू शकतो. त्यांनी सांगितले की झाडांची यादी बनविलेली आहे - म्हणजे सिरन, कडुलिंब, गोल्डन शॉवर, आंबा, आवळा, पिंपळ, जास्वंद, रेन ट्री इ. झाडे लावण्याचे नियोजन आहे.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी एकूण झाडांची संख्या विचारली.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की प्रति हेक्टर २,५०० झाडे लावणार, म्हणजे १५ हेक्टर X २,५०० एवढी झाडे लावणार आहोत.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी हरितपट्टा विकासाची सविस्तर माहिती/प्लॅन टाकणे गरजेचे होते - म्हणजे कोणती झाडे कोणत्या भागात लावणार आहात, त्याचे संगोपन किती वर्षे करणार याबाबत विचारणा केली. तसेच हरितपट्टा विकास व संवर्धन यासाठी आपण काही यंत्रणा उभी केली आहे काय याबाबत विचारणा केली व हरितपट्टा विकसन, संवर्धन व त्याची संपूर्ण माहिती अंतिम पर्यावरण आघात मुल्यां अहवालात समावेश करण्याची सूचना केली.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

१०) **श्री नवनाथ नारायण मोकाशे, राहणार-कान्हेगाव, तालुका-सोनपेठ, जिल्हा-परभणीः-**

ऊसतोडणीसाठी कामगार खूप पैसे मागतात. त्यासाठी कारखान्याने सामाजिक उपक्रम राबवावा.

**प्रकल्प प्रवर्तकांनी** सांगितले की जी सूचना आलेली आहे, त्याचे आम्ही निश्चितच पालन करु. आमच्याकडील ऊस वाहतूक कंत्राटदार आहेत. गेल्या वर्षी साखर आयुक्त कार्यालयात या विषयावर चर्चा झालेली आहे. साखर आयुक्त कार्यालयाने याबाबत परिपत्रक काढलेले आहे. जर कारखान्याकडे तक्रार केली, तर कारखाना वाहतुक कंत्राटदाराकडून पैसे कापून घेईल व शेतक-याला परत देईल.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी प्रकल्प प्रवर्तकांना विचारणा केली की कारखान्यास पर्यावरणविषयक काही तक्रार स्थानिकांनी केल्यास त्याचा निपटारा करण्यासाठी कारखान्याने काही यंत्रणा विकसित केलेली आहे काय?

**प्रकल्प प्रवर्तक** यांनी सांगितले की कारखान्यात पर्यावरण विभाग (Environment Cell) कार्यरत आहे. शेतक-याची, रहिवाशांची प्रकल्पामुळे प्रदूषण झाल्याची तक्रार आल्यानंतर प्रकल्पाचे प्रशासकीय अधिकारी तांत्रिक विभागाशी संपर्क करुन आठ दिवसात तक्रारदाराबरोबर बैठक लावून तक्रारीची निपटारा करण्यात येईल.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी प्रकल्प प्रवर्तकांना विचारणा केली की विस्तारिकरणामुळे कोणत्या प्रदूषणात वाढ होईल?

**पर्यावरण सल्लागार** यांनी उत्तर दिले की विस्तारीकरणामुळे पाण्याचा वापर वाढेल. त्यामुळे सांडपाण्याच्या प्रमाणात वाढ होईल. त्यासाठी प्रकल्पाच्या ईटीपीची क्षमता वाढविण्यात येणार आहे. जेथे सर्वात जास्त प्रदूषण होऊ शकते, ते म्हणजे आसवणी प्रकल्प. त्यासाठी अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा म्हणजे इन्सिनरेशन बॉयलर लावण्यात येणार आहे. त्यामध्ये सांडपाणी जाळण्यात येते. सध्याच्या काळातील हे अद्ययावत तंत्रज्ञान आहे. तसेच हवा प्रदूषण न होण्यासाठी बॉयलरच्या चिमणीस ईएसपी ही अद्ययावत सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे.

**सदस्य, यांनी मत** मांडले की जेवढे अतिरिक्त पाणी उचलणार आहात, तेवढे रेन वॉटर हार्व्हेस्टींग कारखान्याने करणे अपेक्षित आहे. तरी कारखान्याकडून आजूबाजूच्या परिसरात रेन वॉटर हार्व्हेस्टींग करण्याचे नियोजन करण्यात यावे.

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की रेन वॉटर हार्व्हेस्टींग प्रकल्पात केलेले असून, परिसरात रेन वॉटर हार्व्हेस्टींगचा सीईआर व सीएसआर अंतर्गत समावेश करण्यात येईल.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी परत उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

११) <u>श्री सचिन रणदिवे, गाव - शिर्सी, तालुका-सोनपेठ, जिल्हा-परभणीः-</u>

उत्पादन प्रक्रियेत निर्माण होणा-या दूषित सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावण्यात येणार आहे?

**प्रकल्प प्रवर्तक** यांनी सांगितले की बैठकीत चर्चा केल्याप्रमाणे प्रकल्पातील ईटीपीची क्षमता वाढविण्यात येणार आहे. सध्या अस्तित्वात असलेली अत्यंत आधुनिक सयंत्रणा ईटीपीत कार्यरत करण्यात येणार आहे.

**सदस्य, यांनी** सांगितले की बॉयलरसाठी बगॅस वापरणार आहात. तर राख प्रति दिन किती उत्पन्न होईल?

**पर्यावरण सल्लागार** यांनी सांगितले की साधारणतः २० टन राख प्रति दिन उत्पन्न होईल. स्थानिक वीट भट्टीधारकांबरोबर करार करुन त्यांना वीटांसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**सदस्य यांनी** सांगितले की राख ही स्टोअर करणार आहात, ते शास्त्रीयदृष्ट्या त्याची साठवण होणे आवश्यक आहे. तसेच ज्या वीटभट्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाने संमती प्रदान केलेली आहे, ज्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची अनुमती घेतलेली आहे, त्यांनाच राख उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याचप्रमाणे वाहतुक ही बंद वाहनांतूनच करण्यात यावी.

**सदस्य यांनी** मत मांडले की दिवसेंदिवस पर्यावरण कायद्यांची अंमलबजावणी ही कडक होत आहे. बॉयलरमधून जाणा-या धूरास ऑनलाईन मॉनिटरींग सयंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यामुळे कारखान्याने प्रक्रिया केलेले सांडपाण्याची गुणवत्ता, बॉयलरमधून जाणा-या धूराची गुणवत्ता ही कार्यालयातच समजते. जर कंपनीने मानके पाळली नाही, तर पर्यावरणीय भरपाई द्यावी लागते . पर्यावरण सल्लागार यांनी याबाबत प्रकल्प प्रवर्तकांना यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. उदयोग चालले पाहिजेत, त्याचबरोबर पर्यावरणही चांगले राहिले पाहिजे. तरी सर्वांना विनंती आहे की सर्वांनी पर्यावरणाची काळजी घेणे गरजेचे आहे.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी सांगितले की मागच्या वर्षी कारखान्याविरुध्द जल व हवा प्रदूषणाची तक्रार होती. त्याबाबत कारखान्याने काय उपाययोजना केल्या याची माहिती बैठकीत देण्यात यावी.

**प्रकल्प प्रवर्तक** यांनी सांगितले की कारखाना ताब्यात घेऊन काम सुरु करुन दोन हंगाम झालेले होते. मागच्या वर्षी ईटीपीतील सयंत्रणेत बिघाड होऊन बंद पडली व टँक ओव्हरफ्लो होऊन पाणी खालच्या बाजूस गेले. त्याबाबत कारखान्यास तक्रार प्राप्त झाल्यानंतर एक अतिरिक्त आरसीसी टँक युध्द पातळीवर बांधून घेण्यात आला. तसेच कार्यरत ईटीपीत नवीन उपकरणे बसविण्यात आली. तसेच त्यास विद्युत पुरवठा हा दोन स्थळांवरुन करण्यात आला, म्हणजे जर सयंत्रणा ट्रीप झाली तर दुस-या बाजूने वीजपुरवठा करण्यात येईल. टँक ओव्हरफ्लो होऊ नये म्हणून पूर्णपणे काळजी घेण्यात येईल.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी मत मांडले की कारखान्याची वीजेची गरज ही वाढलेली असून त्याबाबत कारखान्याने काही नियोजन केले आहे काय?

**प्रकल्प प्रवर्तक** यांनी सांगितले की आता कारखान्यात २० मेगावॅट वीजेची गरज आहे. तर आसवणी प्रकल्पासाठी ७ मेगावॅटचा एक अतिरिक्त टर्बाईन आणि ५० टीपीएचचा एक बॉयलर बसविणार आहोत. त्याचप्रमाणे कारखान्यात उत्पन्न होणार अतिरिक्त बॅगॅस आहे, तर तो वापरून सहवीज प्रकल्पाचे उत्पादन २० मेगावॅटवरुन ५० मेगावॅटवर जाईल. एक अतिरिक्त टर्बाईन व एक डीजी सेट बसविणार आहोत.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी परत उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

१२) **श्री चंद्रसेखर, पर्यावरणवादी, हैद्राबादः-**

मी पर्यावरण स्वयंसेवक आहे. मी प्रकल्प परिसरात हरितपट्टा विकसित करण्याची सूचना करतो. स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी, सीएसआर निधी हा स्थानिक विकास कामांसाठी खर्च करण्यात यावा. सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यक्षमतेने चालवाव्यात. मी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास मे. ट्वेंटीवन शुगर्स लिमिटेडला पर्यावरण अनुमती प्रदान करण्याची शिफारस करतो.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी परत एकदा उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. त्यावेळी आयोजक यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येणार आहे. प्राप्त लेखी सूचना, अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व इतिवृत्त पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

**आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी स्थानिकांनी बैठकीत उपस्थित राहून सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल स्थानिकांचे, प्रकल्प अधिकारी व शासकीय अधिकारी यांचे आभार मानले व अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी बैठक संस्थिगत करण्यात आली.

लोक सुनावणी दरम्यान श्री. एम. बचैया, एन्व्हायर्नमेंटल पोल्युशन कंट्रोल सोसायटी, हैद्राबाद यांचे लेखी निवेदन प्राप्त झाले. प्राप्त एकूण पाच लेखी निवेदने/पत्रे सोबत जोडलेली आहेत.

**(श्रीपाद रा. कुलकर्णी )**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, परभणी

**(दिलीप को. खेडकर)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद

**(महेश वडदकर),**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, परभणी
जिल्हा- परभणी
Additional Dist. Magistrate
Parbhani.